महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी “मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना” राबविण्यास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- ज्येष्ठना-२०२४/प्र.क्र.१८९/सामासु**
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक :- १४ जुलै, २०२४

**प्रस्तावना:-**

भारत देशात विविध धर्मांचे व पंथांचे अनुयायी वास्तव्यास आहेत. महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जात असून महाराष्ट्रात सर्वाधिक महान संत तसेच धर्मगुरु होऊन गेले आहेत. ज्यांच्या विचारांचा प्रसार हा भारताच्या सीमा ओलांडून झाला असून एक पावनभूमी म्हणून महाराष्ट्राचे नाव घेतले जाते. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची, भक्ती मार्गाची शेकडो वर्षांची परंपरा असून यात लाखो लोक धर्मकार्य, समाजकार्य भक्ती मार्गाने करीत असतात. आपले दैनंदिन कर्तव्य पार पाडीत असताना देखील आपल्या देवदेवतांचे/भगवंताचे नामस्मरण, चिंतन करीत आयुष्य जगत असतात. देशात हिंदू धर्मात चारधाम यात्रा, माता वैष्णोदेवी यात्रा, अमरनाथ यात्रा तसेच इतर धर्मियांचीही मोठी तीर्थस्थळे आहेत जिथे आयुष्यात एकदा तरी जाण्याचे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते. पुण्यकर्म म्हणून तीर्थक्षेत्री जाण्याची सुप्त इच्छा असते. परंतु गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे वा कोणी सोबत नसल्याने आणि पुरेशी माहिती नसल्याने अनेक ज्येष्ठ नागरिकांचे तीर्थयात्रा करण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. सदर बाब विचारात घेऊन सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठया तीर्थ स्थळांना जाऊन मन:शांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे यासाठी राज्यातील सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची/दर्शनाची संधी देण्यासाठी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना" सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील सर्व धर्मियांमधील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत, त्यांना भारतातील तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी **"मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना"** सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**१. योजनेचे नाव :- मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना**

२. **सदर योजनेचे उद्दिष्ट :-** राज्यामधील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र यात्रा मोफत उपलब्ध करुन देणे.

**३. योजनेची व्याप्ती :-** सदर योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य व भारत देशातील प्रमुख तीर्थस्थळांचा समावेश राहील. तीर्थस्थळांची यादी परिशिष्ट-"अ" व "ब" प्रमाणे असेल. सदर यादीमधील स्थळे कमी होऊ शकतात अथवा स्थळांमध्ये वाढ होऊ शकते. सदर योजनेंतर्गत निर्धारित तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल. तसेच प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती रु. ३०,०००/- इतकी राहील. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इ.सर्व बाबींचा समावेश असेल.

**४. योजनेचे लाभार्थी :-** महाराष्ट्र राज्यातील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिक

**५. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-**

(१) लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे.

(२) वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिक.

(४) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

**६. अपात्रता :-**

(१) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.

(२) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित / कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/ भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत असे सदस्य पात्र ठरणार नाहीत. तथापि रु. २.५० लाखापर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी पात्र ठरतील.

(३) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार आहे.

(४) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत.

(५) ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत.

(६) प्रवासासाठी शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे आणि कोणत्याही संसर्गजन्य रोगाने ग्रस्त नसावे जसे की टीबी, हृदयाशी संबंधित श्वसन रोग, कोरोनरी अपुरेपणा, कोरोनरी थ्रोम्बोसिस, मानसिक आजार, संसर्गजन्य कुष्ठरोग इ.

(७) अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे)

(८) जे अर्जदार मागील वर्षांमध्ये लॉटरीत निवडले गेले होते, परंतु प्रवासासाठी आमंत्रित करूनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही, अशा माजी अर्जदारांना देखील या योजनेत पात्र ठरविले जाणार नाही.

(९) जर असे आढळून आले की अर्जदार/प्रवाशाने खोटी माहिती देऊन किंवा कोणतीही तथ्ये लपवून अर्ज केला आहे ज्यामुळे तो/तिला प्रवासासाठी अपात्र ठरते, तर त्याला/तिला कधीही योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवता येईल.

सदर योजनेच्या "पात्रता" व "अपात्रता" निकषामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास शासन मान्यतेने कार्यवाही करण्यात येईल.

**७. सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत :-**

(१) योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.

(२) लाभार्थ्याचे आधार कार्ड/रेशनकार्ड

(३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला.

(लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे १. रेशन कार्ड २. मतदार ओळखपत्र ३. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ४. जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.)

(४) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य) किंवा पिवळे / केशरी रेशनकार्ड

(५) वैद्यकीय प्रमाणपत्र.

(६) पासपोर्ट आकाराचा फोटो.

(७) जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक

(८) सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

**८. रेल्वे प्रवास तसेच बस प्रवासासाठी एजन्सी तथा टूरिस्ट कंपन्यांची निवड** :-

सदर योजनेंतर्गत रेल्वे तथा बस प्रवासाचे आयोजन करण्यासाठी अधिकृत टूरिस्ट कंपन्या तसेच रेल्वे प्रवासासाठी IRCTC समकक्ष अधिकृत असलेल्या नोंदणीकृत कंपन्यांची निवड विहित निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येईल.

**९. लाभार्थ्यांची निवड :-**

प्रवाशांची निवड जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीद्वारे पुढील प्रक्रियेनुसार केली जाईल.

१. प्रत्येक ठिकाणच्या प्रवासासाठी जिल्हानिहाय कोटा निश्चित केला जाईल, ज्यामध्ये अर्जदारांच्या संख्येसह त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिभार देऊन कोटा निश्चित केला जाईल. विहित कोट्यापेक्षा जास्त अर्जांच्या उपलब्धतेवर आधारित लॉटरीद्वारे (लॉट्सचे संगणकीकृत ड्रॉ) प्रवाशांची निवड केली जाईल. कोट्यातील १०० टक्के अतिरिक्त लोकांसाठी प्रतिक्षा यादी देखील तयार केली जाईल.

२. निवडलेला प्रवासी प्रवासाला न गेल्यास, प्रतीक्षा यादीत समाविष्ट असलेल्या व्यक्तीला प्रवासास पाठवता येईल.

३. निवडलेले प्रवासी आणि प्रतीक्षा यादी विभागाच्या पोर्टलवर, जिल्हाधिकारी कार्यालयावर आणि समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि योग्य वाटेल अशा इतर माध्यमांद्वारे प्रसारित केली जाईल.

४. फक्त निवडलेली व्यक्ती तीर्थयात्रेला जाऊ शकेल. तो/ती त्याच्यासोबत इतर कोणत्याही व्यक्तीला घेऊन जाऊ शकणार नाही.

५. जर पती-पत्नीने स्वतंत्रपणे अर्ज केला असेल आणि एकाची लॉटरीत निवड झाली असेल आणि दुसऱ्या जोडीदाराची लॉटरीत निवड झाली नसेल, तर आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे त्यांना किंवा तिला यात्रेवर पाठवण्याचा निर्णय घेऊ शकतील.

**१०. प्रवास प्रक्रिया :-**

१. जिल्हास्तरीय समितीने निवडलेल्या प्रवाशांची यादी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडे सुपूर्द केली जाईल.

२. निवडलेल्या प्रवाशांची यादी प्रवासासाठी अधिकृत टुरिस्ट कंपनी/ एजन्सीला देण्यात देईल.

३. नियुक्त अधिकृत टुरिस्ट कंपनी/एजन्सी टूरवरील प्रवाशांच्या गटाच्या प्रस्थानाची व्यवस्था करेल.

४. प्रवाशांच्या प्रवासासाठी आवश्यक त्या सुविधा आणि कोणत्या सुविधा देण्यात याव्यात याचा निर्णय राज्य शासन घेईल.

५ . सर्व यात्रेकरुंना प्रवासासाठी नियोजित स्थळी त्यांच्या स्वखर्चाने पोहोचावे लागेल.

**(अ) रेल्वे/बसने प्रवास :-**

१. जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे प्रवाशांची सुरक्षा आणि आरोग्याशी संबंधित व्यवस्था सुनिश्चित केली जाईल.

२. प्रवास सुरू झाल्यावर, प्रवासी प्रवासाच्या मध्यभागी असल्यास त्याला प्रवास सोडायचा असेल तर त्याला सरकारकडून तशी सुविधा दिली जाणार नाही आणि विशेष परिस्थितीत, प्रवास मध्यमार्गी सोडणे आवश्यक असल्यास, उपस्थित मार्गदर्शकाच्या परवानगीने स्वखर्चाने ते करण्याची परवानगी दिली जाईल.

**११. प्रवाशांचा गट :-**

हा प्रवास केवळ एकत्रितपणे आयोजित केला जाईल. सदर गट राज्य शासन किंवा शासनाने अधिकृत केलेल्या प्राधिकरण/एजन्सीद्वारे निश्चित केले जातील. शासनाने विहित केलेली किमान प्रवासी संख्या उपलब्ध झाल्यावरच कोणत्याही तीर्थदर्शनाचा प्रवास सुरू होईल.

**१२. इतर लोकांच्या प्रवासावर निर्बंध :-**

या योजनेंतर्गत प्रवासासाठी निवडलेल्या व्यक्तीलाच प्रवास करता येईल. प्रवासाचा खर्च देण्याची तयारी असली तरीही तो प्रवासात इतर कोणत्याही व्यक्तीला सोबत घेऊन जाऊ शकणार नाही. फक्त निवड केलेली व्यक्ती ट्रेन आणि वाहनांमध्ये प्रवास करतील आणि प्रत्येक सीट/बर्थमध्ये फक्त एकच व्यक्ती प्रवास करेल.

प्रवासादरम्यान प्रवाशाला कोणतीही निवड न केलेली व्यक्ती, इतर कोणतेही नातेवाईक किंवा लहान मूल इत्यादींना सोबत नेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**१३. अतिरिक्त खर्चाबाबत:-**

कोणत्याही प्रवाशाला प्रवासादरम्यान देवस्थान व विभागाने ठरवून दिलेल्या निकष/सुविधांव्यतिरिक्त इतर सुविधा घ्यायच्या असतील, तर त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भाराची जबाबदारी संबंधित प्रवाशाची राहील.

**१४. प्रवासादरम्यान प्रवाशांकडून अपेक्षा :-**

१. प्रवाशांना कोणतेही ज्वलनशील पदार्थ किंवा मादक पदार्थ कोणत्याही स्वरूपात वाहून नेण्यास प्रतिबंध राहील.

२. राज्याची/देशाची प्रतिमा खराब होणार नाही अशा रितीने यात्रेकरूंनी यात्रेच्या प्रतिष्ठेनुसार वागावे.

३. प्रवासी त्यांच्या नियुक्त संपर्क अधिकारी / व्यवस्थापक यांच्या सूचनांचे पालन करतील.

४. वरील आचारसंहितेचे पालन करण्याच्या इराद्याबाबत प्रवाशांकडून प्रतिज्ञापत्र घेतले जाईल.

५. प्रवाशांना विभागाच्या विहित प्रणालीमध्ये सहकार्य करावे लागेल आणि शिस्तीत सहकार्य करणे अपेक्षित आहे. कोणताही प्रवासी इतर प्रवाशांची गैरसोय होईल असे वर्तन करणार नाही.

६. साधारणपणे, ट्रेनमध्ये बर्थवर झोपण्याची वेळ रात्री १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत असेल आणि प्रवासी त्यांच्या संबंधित बर्थवर झोपतील. विभागीय गरजेनुसार यावेळी काही बदल केले जाऊ शकतात.

**१५. अर्ज करण्याची प्रक्रिया :-**

योजनेचे अर्ज पोर्टल/मोबाईल ॲपद्वारे/सेतू सुविधा केंद्राव्दारे ऑनलाईन भरले जाऊ शकतात. त्यासाठी पुढील प्रक्रिया विहित केलेली आहे:-

(१) पात्र ज्येष्ठ नागरिकास या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करता येईल.

(२) ज्यांना ऑनलाईन अर्ज सादर करता येत नसेल, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा सेतू केंद्रात उपलब्ध असेल.

(३) अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असेल.

(४) अर्जदाराने स्वतः उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असेल जेणेकरून त्यांचा थेट फोटो काढता येईल आणि KYC करता येईल. यासाठी अर्जदाराने खालील माहिती आणणे आवश्यक आहे.

१. कुटुंबाचे पूर्ण ओळखपत्र (रेशनकार्ड)

२. स्वतःचे आधार कार्ड

**१६. तात्पुरत्या यादीचे प्रकाशन :-**

अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पात्र अर्जदारांची तात्पुरती यादी पोर्टल/ॲपवर जाहीर केली जाईल.

पात्र अंतिम यादीतील अर्जदार दुर्दैवाने मयत झाल्यास सदर अर्जदाराचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.

**१७. मूळ अर्जदारासह जीवनसाथी/सहाय्यकाच्या प्रवासासंबंधीच्या तरतुदी :-**

१. ७५ वर्षावरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यकापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असेल. परंतु अर्जदाराने त्याच्या अर्जात असे नमूद करणे आवश्यक आहे की, त्याचा जीवनसाथी/सहाय्यक देखील प्रवास करण्यास इच्छुक आहे.

२. ७५ वर्षावरील अर्जदाराच्या जोडीदाराचे वय ६० वर्षांपेक्षा कमी असले तरीही प्रवासी सहाय्यक अर्जदारासोबत प्रवास करू शकेल.

३. प्रवासात सहाय्यक घेण्याची सुविधा तेव्हाच उपलब्ध होईल जेव्हा अर्जदाराचे वय ७५ वर्षांपेक्षा जास्त असेल आणि त्याने एकट्याने रेल्वे प्रवासासाठी अर्ज केला असेल. अर्जदाराचे वय ७५ वर्षांपेक्षा कमी असल्यास सहाय्यकांना परवानगी दिली जाणार नाही.

४. सोबत प्रवास करताना जोडीदारासोबत मदतनीस घेण्याची सोय नसेल. जर दोन्ही पती-पत्नीचे वय ७५ वर्षांपेक्षा जास्त असेल आणि अर्जामध्ये मदतनीस नोंदणीकृत असेल, तर तो पाठविला जाऊ शकतो.

५. सहाय्यकाचे किमान वय २१ वर्षे ते कमाल ५० वर्षे असावे. एखादा मदतनीस प्रवासात घेतल्यास, त्याला देखील त्याच प्रकारच्या सुविधा मिळतील ज्या प्रवाशाला परवानगी आहे. सहाय्यक शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रवासासाठी तंदुरुस्त असावा.

६. प्रवासी, पती-पत्नी आणि सहाय्यकांनी प्रवासाशी संबंधित सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे बंधनकारक असेल.

## १८. राज्यस्तरीय समिती :-

सदर योजनेचे संनियत्रण व आढावा घेण्याकरिता राज्यस्तरावर समिती गठीत करण्यात येत असून सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | अध्यक्ष |
| २. | मा.राज्यमंत्री ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | उपाध्यक्ष |
| ३. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ४. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ५. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ६. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, गृह विभाग | सदस्य |
| ७. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, परिवहन विभाग | सदस्य |
| ८. | अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक विभाग | सदस्य |
| ९. | अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| १०. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, नगर विकास विभाग | सदस्य |
| ११. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, विधि व न्याय विभाग | सदस्य |
| १२. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, ग्राम विकास विभाग | सदस्य |
| १३. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| १४. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग | सदस्य |
| १५. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, अल्पसंख्यांक विभाग | सदस्य |
| १६. | अ.मु.स./ प्रधान सचिव / सचिव, महिला व बाल विकास विभाग | सदस्य |
| १७. | सह सचिव /उप सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक तीन महिन्यातून एकवेळेस तसेच आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात यावी.

**राज्यस्तरीय समितीची पुढीलप्रमाणे कर्तव्ये पार पाडेल :-**

१. सदर योजनेचे देखरेख व संनियंत्रण करणे.
२. राज्यातील योजनेचा अंमलबजावणीबाबत आढावा घेणे.
३. सदर योजनेसाठी उपलब्ध तरतूद व खर्च याबाबतचा आढावा घेऊन आवश्यक निधीची मागणी शासनास सादर करणे.
४. ज्येष्ठ नागरिकांच्या प्रवासासाठी आवश्यक व उपयुक्त माहितीचे संकलन करणे.
५. सदर योजनेत धोरणात्मक बदल करावयाचा असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे.
६. शासनाने वेळोवेळी नेमून दिलेली इतर कामे पार पाडणे.

**१९. जिल्हास्तरीय समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री | अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी | उपाध्यक्ष |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४. | आयुक्त, महानगरपालिका/मुख्याधिकारी, नगरपरिषद | सदस्य |
| ५. | पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधीक्षक | सदस्य |
| ६. | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ७. | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य सचिव |

**सदर समितीची बैठक दरमहा तसेच आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात यावी. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-**

(१) सदर योजनेचे देखरेख व संनियंत्रण करणे.

(२) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत नियमित आढावा घेणे.

(३) सदर योजनेसाठी उपलब्ध तरतूद व खर्च याबाबतचा आढावा घेवून आवश्यक निधीची मागणी राज्यस्तरीय समितीकडे सादर करणे.

(४) कालबध्द पध्दतीने पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम करणे व सदर योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेणे.

(५) प्रवाशांची सुरक्षा आणि आरोग्याशी संबंधित व्यवस्था सुनिश्चित करणे

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समितीमध्ये तसेच योजनेची अंमलबजावणी सुकर व्हावी, यासाठी कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांना राहतील. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सदर योजनेचा आढावा दर ३ महिन्यांनी घेण्यात येईल.

**२०. मुल्यांकन :-** सदर योजनेचे मुल्यांकन आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत करण्यात येईल.

**२१. वेबसाईट तयार करणे:-** सदर योजनेची नवीन वेबसाईट बनवण्याचे काम महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून करुन घेण्यात येईल.

**२२. राज्य नोडल अधिकारी :-**

प्रस्तुत योजनेसाठी निवड केलेल्या जिल्हयात आयुक्त, समाजकल्याण, पुणे हे नोडल अधिकारी म्हणून काम करतील .सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी नोडल मंत्रालय असेल.

सदर योजनेच्या अनुषंगाने आवश्यकता भासल्यास नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

**२३. लेखाशिर्ष :-**

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी आवश्यकतेनुसार खर्चासाठी व निधीची तरतूद करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्यात येईल.

या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उपलब्ध होईपर्यंत सद्यस्थितीत वृध्द व अपंगासाठी गृहे या राज्यस्तरीय योजनेसाठी अस्तित्वात असलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या लेखाशिर्ष २२३५-१४३२ मध्ये मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेकरिता नव्याने उपलब्ध करुन देण्यात येणा-या आर्थिक तरतूदीतून सदर खर्च भागविण्यात यावा.

**२४.** सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि.११ जुलै,२०२४ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०७१४१४४९४७२२२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

RAJESH SADASHIV MANJREKAR

Digitally signed by RAJESH SADASHIV MANJREKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=165bc3b66844eff888fd282269f8913cd36baadbc01bcf006e056fb7f6a93c4d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E57ADD6A85F0CF35923F0F015D8E4D4D3A72EC43AD6008F036A3AB06AA1BB85, cn=RAJESH SADASHIV MANJREKAR
Date: 2024.07.15 10:52:48 +05'30'

**सहपत्र- परिशिष्ट-"अ व "ब"**

**( राजेश मांजरेकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
मा.उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानमंडळ, मुंबई
मा. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर

मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर
सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
आयुक्त, समाजकल्याण, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
सर्व पोलीस आयुक्त
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद
सर्व पोलीस अधीक्षक
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
सर्व प्रादेशिक उपायुक्त (समाजकल्याण विभाग)
सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
निवड नस्ती, सामासु

--------------------

## भारतातील तीर्थक्षेत्रे
## परिशिष्ट-अ

**( ज्येष्ठना-२०२४/प्र.क्र. १८९/सामासु )**

| अ.क्र. | मंदिराचे नाव | स्थान |
|---|---|---|
| १. | वैष्णोदेवी मंदिर, कटरा | जम्मू आणि काश्मिर |
| २. | अमरनाथ गुहा, मंदिर | जम्मू आणि काश्मीर |
| ३. | सुवर्ण मंदिर, अमृतसर | पंजाब |
| ४. | अक्षरधाम मंदिर | दिल्ली |
| ५. | श्री दिगंबर जैन लाल मंदिर | दिल्ली |
| ६. | श्री लक्ष्मीनारायण मंदिर | दिल्ली |
| ७. | बद्रीनाथ मंदिर | चमोली, उत्तराखंड |
| ८. | गंगोत्री मंदिर, उत्तरकाशी | उत्तराखंड |
| ९. | केदारनाथ मंदिर , रुद्रप्रयाग | उत्तराखंड |
| १०. | नीलकंठ महादेव मंदिर, ऋषिकेश | उत्तराखंड |
| ११. | यमुनोत्री मंदिर, उत्तरकाशी | उत्तराखंड |
| १२. | बैद्यनाथ धाम, देवघर | झारखंड |
| १३. | काशी विश्वनाथ मंदिर, वाराणसी | उत्तर प्रदेश |
| १४. | इस्कॉन मंदिर, वृंदावन | उत्तर प्रदेश |
| १५. | श्रीराम मंदिर , अयोध्या | उत्तर प्रदेश |
| १६. | सूर्य मंदिर, कोणार्क | ओरिसा |
| १७. | श्री जगन्नाथ मंदिर, पुरी | ओरिसा |
| १८. | लिंगराज मंदिर, भुवनेश्वर | ओरिसा |
| १९. | मुक्तेश्वर मंदिर, भुवनेश्वर | ओरिसा |
| २०. | कामाख्यादेवी मंदिर, गुवाहाटी | आसाम |
| २१. | महाबोधी मंदिर, गया | बिहार |
| २२. | रणकपूर मंदिर, पाली | राजस्थान |
| २३. | अजमेर दर्गा | राजस्थान |
| २४. | सोमनाथ मंदिर, वेरावळ | गुजरात |
| २५. | द्वारकाधीश मंदिर, द्वारका | गुजरात |
| २६. | नागेश्वर मंदिर, द्वारका | गुजरात |
| २७. | सांची स्तूप, सांची | मध्य प्रदेश |
| २८. | खजुराहो मंदिर, खजुराहो | मध्य प्रदेश |
| २९. | महाकालेश्वर मंदिर, उज्जैन | मध्य प्रदेश |
| ३०. | ओंकारेश्वर मंदिर आणि ममलेश्वर मंदिर खंडवा आणि ब्रह्मपुरी | मध्य प्रदेश |
| ३१. | श्री रंगनाथस्वामी मंदिर, श्रीरंगम | कर्नाटक |
| ३२. | गोमटेश्वर मंदिर, श्रवणबेळगोळ | कर्नाटक |
| ३३. | विरुपाक्ष मंदिर, हम्पी | कर्नाटक |
| ३४. | चेन्नकेशव मंदिर, बेलूर | कर्नाटक |
| ३५. | अन्नपूर्णेश्वरी मंदिर, होरानाडू | कर्नाटक |
| ३६. | महाबळेश्वर मंदिर, गोकर्ण | कर्नाटक |

| | | |
|---|---|---|
| ३७. | भूतनाथ मंदिर, बदामी | कर्नाटक |
| ३८. | मुरुडेश्वर मंदिर, मुरुडेश्वर | कर्नाटक |
| ३९. | आयहोल दुर्गा मंदिर, आयहोल | कर्नाटक |
| ४०. | श्रीकृष्ण मंदिर, उडुपी | कर्नाटक |
| ४१. | वीर नारायण मंदिर, बेलावडी | कर्नाटक |
| ४२. | तिरुपती बालाजी मंदिर, तिरुमला | आंध्र प्रदेश |
| ४३. | मल्लिकार्जुन मंदिर, श्रीशैलम | आंध्र प्रदेश |
| ४४. | बृहदीश्वर मंदिर, तंजावर | तामिळनाडू |
| ४५. | मीनाक्षी मंदिर, मदुराई | तामिळनाडू |
| ४६. | रामनाथस्वामी मंदिर, रामेश्वरम | तामिळनाडू |
| ४७. | कांचीपुरम मंदिर, कांचीपुरम | तामिळनाडू |
| ४८. | रंगनाथस्वामी मंदिर, त्रिची | तामिळनाडू |
| ४९. | अरुणाचलेश्वर मंदिर, तिरुवन्नमलाई | तामिळनाडू |
| ५०. | कैलासनाथ मंदिर, कांचीपुरम | तामिळनाडू |
| ५१. | एकंबरेश्वर मंदिर, कांचीपुरम | तामिळनाडू |
| ५२. | सारंगपानी मंदिर, कुंभकोणम | तामिळनाडू |
| ५३. | किनारा मंदिर, महाबलीपुरम | तामिळनाडू |
| ५४. | मुरुगन मंदिर, तिरुचेंदूर | तामिळनाडू |
| ५५. | श्री पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवनंतपुरम | केरळ |
| ५६. | गुरुवायूर मंदिर, गुरुवायूर | केरळ |
| ५७. | वडक्कुन्नाथन मंदिर, त्रिशूर | केरळ |
| ५८. | पार्थसारथी मंदिर, अरनमुला | केरळ |
| ५९. | शबरीमाला मंदिर, पथनामथिट्टा | केरळ |
| ६०. | अट्टुकल भगवती मंदिर, तिरुवनंतपुरम | केरळ |
| ६१. | श्रीकृष्ण मंदिर, गुरुवायूर | केरळ |
| ६२. | थिरुनेल्ली मंदिर, वायनाड | केरळ |
| ६३. | वैकोम महादेव मंदिर, वर्कला | केरळ |
| ६४. | तिरुवल्ला मंदिर, तिरुवल्ला | केरळ |
| ६५. | शिवगिरी मंदिर, वर्कला | केरळ |
| ६६. | श्री सम्मेद शिखरजी (गिरिडीह) | झारखंड |
| ६७. | शत्रुंजय हिल | गुजरात |
| ६८. | गिरनार | गुजरात |
| ६९. | देवगड | उत्तर प्रदेश |
| ७०. | पावापुरी | बिहार |
| ७१. | रणकपूर | राजस्थान |
| ७२. | दिलवाडा टेंम्पल | राजस्थान |
| ७३. | उदयगिरी | मध्यप्रदेश |

***************

## महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे

## परिशिष्ट- ब

## (ज्येष्ठना-२०२४/प्र.क्र. १८९/सामासु)

| अ.क्र. | तीर्थक्षेत्राचे नाव | जिल्हा |
|---|---|---|
| १. | सिद्धिविनायक मंदिर | मुंबई, |
| २. | महालक्ष्मी मंदिर | मुंबई |
| ३. | चैत्यभूमी दादर | मुंबई |
| ४. | माउंट मेरी चर्च (वांद्रे) | मुंबई |
| ५. | मुंबादेवी मंदिर | मुंबई |
| ६. | वाळकेश्वर मंदिर मलबार हिल | मुबई |
| ७. | विश्व विपश्यना पॅगोडा गोराई | मुंबई |
| ८. | चर्च ऑफ अवर लेडी ऑफ हेल्थ, कॅवेल | मुंबई |
| ९. | सेंट अँड्र्यू चर्च | मुंबई |
| १०. | सेंट जॉन द बॅप्टिस्ट चर्च , सीप्झ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी | मुंबई |
| ११. | सेंट जॉन द बॅप्टिस्ट चर्च, मरोळ | मुंबई |
| १२. | गोदीजी पार्श्वंत मंदिर | मुंबई |
| १३. | नेसेट एलियाहू सिनेगॉग , फोर्ट | मुंबई |
| १४. | शार हरहमीम सिनेगॉग , मस्जिद भंडार | मुंबई |
| १५. | मॅगेन डेव्हिड सिनेगॉग , भायखळा | मुंबई |
| १६. | सेंट जॉन द बॅप्टिस्ट चर्च | ठाणे |
| १७. | अग्यारी / अग्निमंदिर | ठाणे |
| १८. | मयुरेश्वर मंदिर , मोरगाव | पुणे |
| १९. | चिंतामणी मंदिर , थेऊर | पुणे |
| २०. | गिरिजात्मज मंदिर , लेण्याद्री | पुणे |
| २१. | महागणपती मंदिर , रांजणगाव | पुणे |
| २२. | खंडोबा मंदिर , जेजुरी | पुणे |
| २३. | संत ज्ञानेश्वर समाधी मंदिर , आळंदी | पुणे |
| २४. | भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर, खेड तालुका | पुणे |
| २५. | संत तुकाराम महाराज समाधी मंदिर , देहू | पुणे |
| २६. | संत चोखामेळा समाधी , पंढरपूर | सोलापूर |
| २७. | संत सावतामाळी समाधी मंदिर अरण ता. माढा | सोलापूर |
| २८. | विठोबा मंदिर , पंढरपूर | सोलापूर |
| २९. | शिखर शिंगणापूर | सातारा |
| ३०. | महालक्ष्मी मंदिर , कोल्हापूर | कोल्हापूर |
| ३१. | जोतिबा मंदिर | कोल्हापूर |
| ३२. | जैन मंदिर, कुंभोज | कोल्हापूर |
| ३३. | रेणुका देवी मंदिर , माहूर | नांदेड |

| | | |
|---|---|---|
| ३४. | गुरु गोविंद सिंग समाधी, हजूर साहिब , नांदेड | नांदेड |
| ३५. | खंडोबा मंदिर, मालेगाव | नांदेड |
| ३६. | श्री संत नामदेव महाराज देवस्थान, उब्रज ता. कंधार | नांदेड |
| ३७. | तुळजा भवानी मंदिर , तुळजापूर | धाराशिव |
| ३८. | संत एकनाथ समाधी, पैठण | छत्रपती संभाजीनगर |
| ३९. | घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर , वेरूळ | छत्रपती संभाजीनगर |
| ४०. | जैन स्मारके , एलोरा लेणी | छत्रपती संभाजीनगर |
| ४१. | विघ्नेश्वर मंदिर , ओझर | नाशिक |
| ४२. | संत निवृत्तीनाथ समाधी, त्र्यंबकेश्वर जवळ | नाशिक |
| ४३. | त्र्यंबकेश्वर शिव मंदिर , त्र्यंबकेश्वर | नाशिक |
| ४४. | मुक्तीधाम | नाशिक |
| ४५. | सप्तशृंगी मंदिर , वणी | नाशिक |
| ४६. | काळाराम मंदिर | नाशिक |
| ४७. | जैन मंदिरे, मांगी-तुंगी | नाशिक |
| ४८. | गजपंथ | नाशिक |
| ४९. | संत साईबाबा मंदिर, शिर्डी | अहमदनगर |
| ५०. | सिद्धिविनायक मंदिर , सिद्धटेक | अहमदनगर |
| ५१. | शनी मंदिर , शनी शिंगणापूर , | अहमदनगर |
| ५२. | श्रीक्षेत्र भगवानगड , पाथर्डी | अहमदनगर |
| ५३. | बल्लाळेश्वर मंदिर , पाली | रायगड |
| ५४. | संत गजानन महाराज मंदिर , शेगाव | बुलढाणा |
| ५५. | एकवीरा देवी , कार्ला | पुणे |
| ५६. | श्री दत्त मंदिर, औदुंबर | सांगली |
| ५७. | केदारेश्वर मंदिर | बीड |
| ५८. | वैजनाथ मंदिर, परळी | बीड |
| ५९. | पावस | रत्नागिरी |
| ६०. | गणपतीपुळे | रत्नागिरी |
| ६१. | मार्लेश्वर मंदिर | रत्नागिरी |
| ६२. | महाकाली देवी | चंद्रपूर |
| ६३. | श्री. काळेश्वरी उर्फ काळुबाई मंदिर | सातारा |
| ६४. | अष्टदशभुज (रामटेक) | नागपूर |
| ६५. | दीक्षाभूमी | नागपूर |
| ६६. | चिंतामणी (कळंब) | यवतमाळ |

***************